# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 13/06/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

### खुनाचा प्रयत्न

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा देवग्राम येथे दिनांक ०५/०६/२०२३ चे १७/३० वा. ते १९/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सिंधुबाई सुबाससिंग राठोड, वय ६० वर्ष, रा. देवग्राम ता. नरखेड, जि. नागपूर याचा मुलगा नामे– योगेंद्र सुभाषसिंग राठोड, वय ४० वर्षे यास **आरोपी क्र. १) नामे– पिंटु उर्फे चिंटु उत्तमराव सोनोले वय अंदाजे २७ वर्षे** याने कारे पागल योगेंद्रा असे सायंकाळी ५:३० वा. दरम्यान चिडवुन शिवीगाळ केली त्यानंतर सायंकाळी ६:३० वा. ते ०७/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी व तिचा मुलगा योगेंद्र राठोड हा घरी असताना आरोपी क्र. २) प्रविन उत्तमराव सोनोले, वय अंदाजे ३० वर्ष ३) ०२ महिला आरोपी सर्व रा. देवग्राम ता. नरखेड जि. नागपुर यांनी संगनमत करून फिर्यादीचे घरात येवुन आरोपी पिंटु उर्फ चिंटु उत्तमराव सोनोले यानी हातात विळा घेवुन २) प्रविण उत्तमराव सोनोले हा हातात चाकु घेवुन आला व काही कारण नसताना विळयाने व चाकुने फिर्यादीचे मुलास मारण्यास सुरवात केली त्यावेळी महिला आरोपी हिने पावसी घेवुन मुलाला मारले व आरोपी क्र. २ ची पत्नी महिला आरोपी हिने हातात गोटा घेवुन फिर्यादीस हातबुक्क्यांनी मारहान करून शिवीगाळ केली. मारहान केल्याने फिर्यादीचे मुलास डोक्यावर मागील बाजुस, पोटावर, दोन्ही मांडयावर जखम झाली व फिर्यादीस कमरेला व छातीला मुक्का मार लागला असुन नमुद आरोपीने मारहान केल्याने गंभीर जखमी झाला असुन त्यास जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५२, ३०७, ५०४, ३२३, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे पो.स्टे. जलालखेडा मो. नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा मोहगाव शिवार रोड येथे दिनांक ११/०६/२०२३ चे २१/०० वा. दिनांक १२/०६/२०२३ चे सकाळी ०५/०० वा. पर्यंत यातील अज्ञात चोरानी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. खापा ग्रामिण वितरण केंद्र अंतर्गत येणाऱ्या मोहगाव जंगली शिवारातील गडमी भागातील आनंदराव डोहळे, शालिकराम कुंभरे व शेषराव युवनाते यांचे शेतातील लघुदाब वाहिनीचे ९ सिमेंटचे खांब तोडुन ५०००/–रू. चे नुकसान केले तसेच १८० किलो वजनाचे २५०० मिटर लांबीचा ॲल्युमिनीयम तार किंमती अंदाजे २०,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरटयांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रशांत पुरूशोत्तम शेटे, वय ४७ वर्ष, रा. खापा सहाय्यक अभियंता म. रा. वि. कं मर्या. खापा ग्रामिण यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशि संतोश परतेती ब. नं. २१६३ पोस्टे खापा हे करीत आहे.

# चोरी

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा भागेमाहेरी शिवार येथे दिनांक ११/०६/२०२३ चे २३/०० वा. ते दिनांक १२/०६/२०२३ चे ०५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीचा मुलगा नामे— महंत याने सायंकाळी ०६/०० वा. पर्यंत मोसंबीचे बगीचाला पाणी ओलीताचे काम करून घरी परत आला. दि. १२/०६/२०२३ रोजी फिर्यादीचा मूलगा महंत हा ०५/३० वा. सुमारास शेतात गेला व मोसंबीचे झाडाला पाणी ओलण्याकरीता विहीरीजवळ गेला असता त्याला विहीरीमध्ये लावलेली ०५ एच. पी ची पाणडुब्बी इलेक्ट्रीक मोटार दिसून आली नाही. मोटरला लागलेला पाईप कापलेला दिसला. फिर्यादीची इलेक्ट्रीक मोटार लक्ष्मी कंपनीची किंमती अंदाजे ८,०००/— रू. आणि इलेक्ट्रीक केबल किंमती १,०००/— रू. असा एकूण ९,०००/— रूपयाचा मुद्‌देमाल अज्ञात चोराने चोरी करुन घेवुन गेले आहे. शेताचे ५०० फूट अंतरावर असलेले शेतकरी नामे— पंकज यूवराज रहाटे रा. मंगमा यांची मोसंबी झाडाची शेती त्याचे शेतात असलेल्या विहीरीतील टेक्समो कंपनीची ०५ एच. पी पाणडुब्बी मोटार किंमती अंदाजे ५,०००/— रूपयाची असा एकूण १९,०००/— रूपयाची इलेक्ट्रीक पाणडुब्बी मोटार कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून घेऊन गेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— दिवाकर बापुराव सुर्यवंशी, वय ४९ वर्ष रा. भागेमाहेरी, ता. सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार किशोर ठाकरे ब. नं १५४७ मो. नं. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**